# महाराष्ट्र परावैद्यक परिषद,मुंबई

गेट क्र ०२, कामा व आल्बेस रुग्णालय, पहिला मजला, नवीन प्रशासकीय
इमारत महापालिका मार्ग, धोबी तलाव, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी क्र.९१-२२-२२६२०३६०
ई-मेल आयडी-mpmcmumbai२०१७@gmail.com
वेबसाईट -www.maharashtraparamedicalcouncil.org

---

जा.क्र.मपवैप/परिषद/०३/२०२६, दि.०८/०१/२०२६

**परिपत्रक**

**विषय: - महाराष्ट्र परावैद्यक परिषदेचे नोंदणीसाठी/नुतणीकरण्याचे अर्ज स्विकारण्याबाबत...**

**संदर्भ: - परिषदेचे दि.१९/११/२०२५ ची जाहिर सूचना क्र. मपवैप/परिषद/३३४/२०२५**

महाराष्ट्र शासनाच्या आदेशान्वये या परिषदेत नवीन नोंदणी/नुतणीकरणासाठीचे अर्ज दि.३०/११/२०२५ नंतर परिषदेच्या उपरोक्त परिपत्रकांन्वये स्विकारणे बंद करण्यात आले होते. तथापी अद्यापही केंद्र शासनाच्या National Commission for Allied & Healthcare Professions चे नोंदणी संदर्भात नियमावली अधिसुचित झाली नसल्याने या परिषदेला दि.३१/१२/२०२५ च्या आदेशाप्रमाणे शासन पत्र क्र. File No.: MEDD-१४२०/२/२०२४MMDAdhi/comp.no८४०० अन्वये दि.३१ मार्च, २०२६ पर्यन्त किंवा त्यापुर्वी NCHP चे नोंदणी संदर्भात नियमावली अधिसुचित होईपर्यंत यापैकी अगोदर/पुर्वी घडेल तो पर्यन्तच नव्याने नोंदणी/नोंदणी नुतनीकरणाचे अर्ज स्विकारण्यास मंजूरी दिलेली आहे या संबंधीत नोंद घ्यावी.

Sd/-

**(श्रीमती. शिल्पा किरण परब)**
**प्रबंधक,**
**महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई**

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
नवीन मंत्रालय, ९वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.
E-mail: medd.adhiniyam@gov.in

File no: MEDD- १४०२०/२/२०२४-MMDAdhi/comp.no८४००३५ दिनांक- ३१.१२.२०२५

प्रति,
१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अलाईड ॲण्ड हेल्थ केअर परिषद, मुंबई.
२. प्रबंधक, महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई.
३. प्रबंधक, महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई.

विषय : महाराष्ट्र राज्य अलाईड ॲण्ड हेल्थ केअर परिषदेमध्ये महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद आणि महाराष्ट्र राज्य परावैद्यक परिषद, मुंबई यांचा समावेश करण्याबाबत.
संदर्भ : MEDD- १४०२०/२/२०२४-MMDAdhi/comp.no८४००३५, दिनांक- ३१.१२.२०२५ चे पत्र .

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाधिन पत्र कृपया पहावे.

२. संदर्भाधिन पत्रान्वये राज्यात कार्यरत असणाऱ्या महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद व महाराष्ट्र परावैद्यक परिषद या दोन्ही परिषदांना नविन नोंदणीसाठीचे अर्ज स्वीकारण्यासाठी दि.३०.११.२०२५ पर्यंतची मुदत देण्यात आली होती. तसेच तद्नंतर नविन नोंदणीचे अर्ज न घेण्याबाबत व त्यांच्याकडील सर्व प्रलंबित कामकाज पूर्ण करून दोन्ही परिषदांचा कार्यभार महाराष्ट्र राज्य अलाईड अँड हेल्थकेअर परिषद यांच्याकडे हस्तांतरित करण्यास दि.३१.१२.२०२५ पर्यत मुदत देण्यात आली होती. तसेच सदर पत्रामध्ये प्रस्तावित कालमर्यादेच्या आधीच National Commission For Allied And Healthcare Profession चे रेग्युलेशन्स अधिसूचित झाल्यास त्या दिवसापासून यादोन्ही परिषदांचे कामकाज संपुष्टात येऊन सर्व प्रलंबित कामकाज महाराष्ट्र राज्य अलाईड अँड हेल्थकेअर परिषदेमार्फत करण्यात येईल असे आदेश सर्व संबंधित परिषदांना देण्यात आले होते.

३. तथापि अद्यापही National Commission For Allied And Healthcare Profession चे नोंदणी संदर्भात नियमावली अद्यापही अधिसूचित झाली नसल्याने व या संदर्भात कोणतीही अंतरिम व्यवस्थेची तरतूद महाराष्ट्र राज्य अलाईड ॲण्ड हेल्थ केअर परिषदेकडे नसल्याने महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद व महाराष्ट्र राज्य परावैद्यक परिषदांना दि.३१ मार्च, २०२६ पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे. या कालावधीपूर्वी तसेच नव्याने नोंदणी अर्ज स्वीकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच National Commission For Allied And Healthcare Profession तर्फे

नोंदणी संदर्भात नियमावली अधिसूचित झाल्यास त्या दिनांकापासूनच महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद आणि महाराष्ट्र राज्य परावैद्यक परिषदचे कामकाज संपुष्टात येईन व तेव्हापासून हे सर्व कामकाज महाराष्ट्र राज्य अलाईड ॲण्ड हेल्थ केअर परिषदेमार्फत करण्यात येईल.

आपली,

(डॉ.सुवर्णा.सि.खरात)
सहसचिव, महाराष्ट्र शासन